महासागर
शुक्रवार, दि. 18 ऑक्टोंबर 2024
अमरावती
पान 3



## गोविंदा.... गोविंदा......

**चांदूर बाजार**– देऊरवाडा काजळी या गावांमध्ये कोजागिरी पौर्णिमेला बालाजी यात्रा महोत्सव मोठ्या आनंदाने फार पाडला जातो. यावेळी दूसऱ्या दिवशी रथयात्रा काढून ब्राह्मणपुरी बालाजी देवस्थानचे तीर्थविसर्जन केले जाते, तो क्षण.

# त्या विवस्त्र तरुणीची हत्याच

## मृतदेहाच्या पीएम अहवालावरून खुनाचा गुन्हा | एकाला अटक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – बडनेरा रेल्वे स्थानक परिसरात दोन दिवसांपूर्वी एका तरुणाचा विवस्त्र अवस्थेत मृतदेह आढळून आला. महिलेच्या अंगावर तथा घटनास्थळी रक्ताचे डाग दिसून आले होते. या घटनेनंतर बडनेरा पोलिसांनी मृतदेहाला शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. 17 ऑक्टोंबर रोजी मृतक महिलेच्या मृतदेहाचा शवविच्छेदन अहवाल पोलिसांना प्राप्त झाला. तसेच या घटनेतील प्रत्यक्षदर्शीच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी दोन आरोपींविरुध्द खुनाचा गुन्हा नोंदवून एकाला अटक केली आहे. तर दुसऱ्या आरोपीचा पोलिस कसून शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार शेखर नारायण चिंचोलकर (34, जुनीबस्ती, बडनेरा) असे अटक आरोपीचे नाव आहे. 15 ऑक्टोबर रोजी सकाळी 9 वाजताच्या सुमारास रेल्वे स्थानक परिसरात एका 35 वर्षीय अनोळखी महिलेचा रक्ताने माखलेला विवस्त्र अवस्थेत मृतदेह आढळून आला. संबंधित महिलेवर लैंगिक बलात्कार करून नंतर तिचा खून करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या घटनेनंतर बडनेरा पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता पाठविला. पोलिसांना शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर याप्रकरणात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारू पिऊन तरुणीवर विटा, दगडांनी हल्ला

या घटनेच्या अनुषंगाने पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसरात चौकशी केली असता, तेथे पाण्याच्या बॉटलीचा व्यवसाय करणारा राजकुमार साहू याने सांगितले की, रात्री 10 वाजताच्या सुमारास जोरजोरात आवाज आल्याने मी झोपेतून उठलो. त्यावेळी दोन इसम हे मद्यधुंद अवस्थेत एका महिलेला मारहाण करीत होते. महिला व ते दोन इसम हे खुप दारू पिलेले होते. त्यामुळे मी तेथे गेलो नाही. तेथून निघून गेले. परंतू त्यापैकी शेखर चिंचोळकर याला मी ओळखतो, या माहितीवरून पोलिसांनी आरोपी शेखर चिंचोळकरला ताब्यात घेतले.

आरोपी व तरुणी यांचे दारू पिऊन काही कारणावरून वाद झाले. त्यानंतर आरोपींनी तरुणीला विटा व दगडाने मारहाण केली. ही बाब पोलिस चौकशीत पुढे आली आहे. याप्रकरणात गुन्हा नोंदवून आरोपीला अटक करण्यात आली असून, एका आरोपीचा शोध सुरु आहे.

**सुनिल चव्हाण,**
**पोलिस निरीक्षक,**
**बडनेरा ठाणे.**

# गोलूच्या मारेकऱ्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी

## शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.17 )** – क्षुल्लक कारणावरून गोलू ऊर्फ निशांत सुनील उसरटे याचा खून झाल्याची घटना मंगळवारी रात्री चित्रा चौकात घडली. या घटनेनंतर काही तासांनंतर तीन आरोपींना विशेष पथकाचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले आणि सीआययूच्या पथकाने अटक केली. तिन्ही आरोपींना गुरुवारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना 21 ऑक्टोबरपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

15 ऑक्टोबर रोजी रात्री चित्रा चौकात किरकोळ वादातून रतनगंज येथील रहिवासी गोलू सुनील उसरटे याचा छातीत चाकू आणि डोक्यावर हुकने वार करून खून करण्यात आला. या घटनेनंतर गोलू उसरटे यांच्या कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांनी रोष व्यक्त करून कोतवाली पोलिस ठाण्यासमोर ठिय्या मांडला होता. आरोपींच्या अटकेची मागणी केल्यानंतर काही तासांतच या प्रकरणी आरोपी योगेश गजानन गरुड, विकी परशुराम गुप्ता आणि कमल उर्फ रोशन रमेश साहू यांना अटक करण्यात आली होती. पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर करून, चौकशीकरिता पोलिस कोठडीची मागणी केली. त्यानुसार न्यायालयाने आरोपींना पाच दिवसांची कोठडी सुनावली आहे.

# 6 हजार रुपयांची लाच मागणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यासह एकाला अटक

## लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – सौरऊर्जा मीटर रिलीज करण्यासाठी सहा हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने एका कनिष्ठ अभियंत्यासह दोघांना अटक केली आहे. कनिष्ठ अभियंता मुकेश बबनराव भोयर (40, रा. साई निर्माण अपार्टमेंट, फ्लॅट क्रमांक 106, एशियाड कॉलनी) आणि दयाल प्रकाशराव गजघने (40, रा. मुदलियार नगर, मोती नगर रोड, अमरावती) अशी लाचखोरांची नावे आहेत. वृत्त लिहेपर्यंत त्याच्याविरुद्ध राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई महावितरणच्या एमआयडीसी स्थित उपविभाग 4 मध्ये 17 ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली.

तक्रारदार स्वतच्या नावाने फर्म चालवतात. या फर्मच्या माध्यमातून ते प्रत्येक घरात सोलर पॅनल बसवण्याचे काम करतात. तक्रारदार यांना बडनेरा येथील मशिदीत सोलर पॅनल बसविण्याचे काम मिळाले होते. नियमानुसार हे काम केल्यानंतर 7 ऑक्टोबर 2024 रोजी महावितरणच्या उपविभाग 3 कार्यालयात मीटर रिलिजसाठी त्यांनी अर्ज केला. यावेळी कार्यालयातील मुकेश भोयर व दयाल गजघने यांनी मीटर सोडण्यासाठी तक्रारदाराकडे 10 हजार रुपयांची लाच मागितली होती. ज्याची लेखी तक्रार एसीबीमध्ये करण्यात आली होती. तक्रारीच्या आधारे एसीबीच्या पथकाने मागणीची पडताळणी केली. त्यात असे आढळून आले की, 11 ऑक्टोबर 2024 रोजी कनिष्ठ अभियंता आणि अन्य कर्मचारी दयाल यांच्यात झालेल्या करारानंतर 6,000 रुपये घेऊन मीटर सोडण्याचे ठरले होते. त्यानंतर 14 ऑक्टोबर रोजी सापळा रचण्यात आला, मात्र कनिष्ठ अभियंता व त्यांच्या कर्मचाऱ्यांचा संशय आल्याने त्यांनी ठरलेली रक्कम स्वीकारली नाही. त्यानंतर चौकशीनंतर 17 ऑक्टोबरला कनिष्ठ अभियंता आणि इतर कर्मचाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले. राजापेठ पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई एसीबीचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक मंगेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक केतन मांजरे, पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार पाटील, प्रमोद रायपुरे, आशिष जांभोळे, वैभव जायले, विनोद कुंजाम, कुणाल काकडे, चालक पोलीस उपनिरीक्षक सतीश किटुकले यांनी केली.

# दोन फ्लॅट फोडून पाच लाखांचा माल लंपास

## नांदगावपेठ पेठ हद्दीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन फ्लॅटमधून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम व दागिन्यांसह सुमारे पाच लाखांहून अधिक रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. 15 आणि 16 ऑक्टोबर रोजी या घटना उघडकीस आल्या. या दोन्ही प्रकरणी नांदगावपेठ पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नांदगाव पेठ हद्दीतील जावरकर लॉनच्या मागे असलेल्या गीता रेसिडेन्सीमध्ये अज्ञात चोरांनी एका फ्लॅटच्या दाराचे कुलूप तोडून 78 हजार रुपयांची रोख, 30 हजार रुपये किमतीची 5 ग्रॅमची अंगठी, जॅकेटमध्ये ठेवलेली 40 हजार रुपये किमंतीची 7 ग्रॅम सोन्याची अंगठी, असा एकूण 1.48 लाख रुपयांचा माल चोरून नेला. याप्रकरणी उदय बाळकृष्ण मोरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तसेच नीलेश शालिकराम अडगोकार (40, रा. मारोती रेसिडेन्सी, अर्जुन नगरजवळील पोलीस कॉलनी) हे फ्लॅटला कुलूप लावून कार्यालयात गेले होते. दुपारी 3.30 च्या सुमारास ते घरी परतले असता त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्याने घरात जाऊन पाहीले असता, अज्ञात चोरट्यांनी मंगळसूत्र 28 ग्रॅम, कानातले 5 ग्रॅम, सोन्याची चेन 15 ग्रॅम, सोन्याचे मेडल 1 ग्रॅम, एकूण 54 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि 2 हजार रुपयांची रोख असा एकूण 3 लाख 26 रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे दिसले. या घटनेची तक्रार नीलेश अडगोकार यांनी नांदगावपेठ पोलिसांत दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### मोर्शीत गावठी दारूवर धडक कारवाई

**मोर्शी** – सण-उत्सव व आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोर्शी पोलिसांनी अवैध गावठी हातभट्टी दारु विक्री करण्यासाठी आणणाऱ्या आरोपींविरुद्ध धडक मोहीम हाती घेतली आहे. नुकतेच मोर्शी पोलिसांनी मध्यप्रदेश येथून महाराष्ट्रात अवैध्य गावठी दारू आणून विक्री करणाऱ्या युवकास रंगेहात पकडून त्यांच्याकडून जवळपास 12 हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

गावठी मोहाच्या हातभट्टीची दारु महाराष्ट्रात विक्रीसाठी आणल्या जात असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने अमरावतीचे पोलीस अधीक्षक ग्रामीण विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संतोष खांडेकर, मोर्शीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरकुल, पोलिस हवालदार स्वप्निल बायस्कर, छत्रपती करपते निलेश देशमुख, सौरभ धरमठोक यांनी हिवरखेड येथील सतीश साहेबराव आहाके याच्या घरी धाड टाकली. त्या ठिकाणी काळ्या रंगाच्या रबरी ट्यूबमध्ये साठवून ठेवलेली 120 लिटर अवैध गावठी हातभट्टीची 12 हजार रुपये किमतीची दारू पकडण्यात आली.

# 25 लाख हुंडा मागून मोडले लग्न

## फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** – 25 लाखांची मागणी करून वर मंडळीने लग्न मोडल्याची तक्रार वधु पक्षाने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात करण्यात आली. मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी नागपूरच्या काटोल येथील रहिवासी उमेश उत्तमराव पाटील, योगेश पाटील, विनोद ढोले आणि एका महिलेवर गुन्हा दाखल केला आहे.


फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार्या एका तरुणीचे उमेश पाटील याच्याशी लग्न ठरले होते. लग्नाला येण्यासाठी बसचा खर्च, मुलीचे दागिने आणि तीन लाख रुपये रोख अशी मागणी वर पक्षाने वधु पक्षाकडे केली होती. वराचा बायोडेटा योग्य वाटल्याने मुलीच्या वडिलांनी हा खर्च उचलण्याचे मान्य केले. दरम्यान 19 जुलै 2024 रोजी अमरावती येथे साक्षगंध सोहळा पार पडला. ज्यामध्ये मुलीच्या वडिलांनी भावी जावयासाठी 6 ग्रॅमची अंगठी, 10 ग्रॅमची चेतन आणि 2 लाख रुपये असे एकूण 3 लाख रुपये खर्च केले होते. मात्र यानंतर उमेश पाटील यांच्या बहिणीने वधु पक्षाला फोन करून तुम्ही 25 लाख रुपये दिले नाहीत, तर तुझे लग्न होणार नाही, असे सांगितले. मुलीच्या वडिलांनी लग्नाची तारीख 5 डिसेंबर 2024 ठरविली होती. ज्यासाठी एक रिसॉर्टही बुक करण्यात आले होते. ज्याची आगाऊ रक्कमही त्यांनी दिली होती.

मात्र त्यानंतर मुलीच्या वडिलांनी भावी जावयाबद्दल चौकशी केली असता त्याने बायोडेटामध्ये दिलेली माहिती खोटी असल्याचे समजले. त्यामुळे आपली फसवणूक केल्याचे वधु पक्षाच्या लक्षात आले. त्यामुळे मुलीच्या वडिलांनी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# महायुती, मविआ ला बंडखोरांचे आव्हान

## जिल्ह्यात अधिक मजबूत होण्याचा भाजपचा प्रयत्न | आचारसंहिता लागू होताच राजकिय ब्ल्यु प्रिंटची आखणी








**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती/चांदूर बाजार, ( दि.17 )**– राज्याचा विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता घोषीत होताच प्रशासनाबरोबरच राजकिय पुढारीही कामाला लागले आहे. इच्छुक उमेदवारी आणि पुढारी निवडणूकीची राजकीय ब्ल्यु प्रिंट आखत असताना त्यांना बंडखोरांच्या आव्हानाची चिंता लागली आहे. महाविकास आघाडी आणि महायुती दोन्हीकडे बंडखोरांना रोखण्याकरिता योग्य ते पाऊल उचलण्याकरिता योजना आखत आहेत. काँग्रेसचा गड असलेल्या अमरावती जिल्ह्याला भाजपचा गड कसा बनविता येईल याकरिता भाजपजन पुर्ण ताकदीनिशी कामाला लागले आहे.

अमरावती जिल्ह्यातील राजकीय दृष्ट अभ्यास केला असता जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व पाहायला मिळते तर केंद्रात आणि राज्यात सत्ता असताना देखील भारतीय जनता पार्टीला जिल्ह्यात पाहिजे तसे यश मिळाले नाही. त्यासाठी आता पक्षाकडून जिल्ह्यासाठी विशेष लक्ष केंद्रित केले असल्याचे बोलले जात आहे. अमरावती जिल्ह्यात सहा विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीचे फक्त एकच आमदार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत आपले आमदार वाढविण्याकरिता भाजपकडून काय रणनीती तयार केली जाते, हे पाहण्यासारखे राहील. अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सुलभा खोडके यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाण्याची तयारी केल्याने आता महाविकास आघाडी काँग्रेसकडून माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख यांना मैदानात उतरविणार आहे. तर माजी मंत्री जगदीश गुप्ताही मैदानात येवू शकतात. त्यामूळे या ठिकाणी तिहेरी लढतीचे चित्र स्पष्ट दिसत आहे. धामणगाव रेल्वे मतदार संघात विद्यमान आमदार प्रताप अडसड, माजी आमदार वीरेंद्र जगताप तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी निलेश विश्वकर्मा निवडणूक रिंगणात दिसणार आहे. गेल्या निवडणूकीत वरुड-मोर्शी मतदार संघात विद्यमान आमदार देवेंद्र भुयार अपक्ष निवडून आले होते.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला हाती घेतल्याने या ठिकाणी भाजपकडून बंडखोरीचे चिन्ह दिसत आहे. तर महाविकास आघाडीकडून देखील उमेदवार देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अचलपूर मतदार संघात गेल्या वीस वर्षांपासून एका हाती सत्ता ठेवणारे बच्चू कडू यंदाही महाविकास आणि महायुती विरहित तिसऱ्या आघाडीतून प्रहारवरच लढणार आहेत. आ.कडू यांच्या विरोधात मविआकडून काँग्रेस पक्षाचे अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख, तर भारतीय जनता पार्टी कडून इच्छुक उमेदवाराची लांबलचक यादी आहे. याठिकाणीही बंडखोरी होण्याचे चित्र आहे. मेळघाट मतदार संघात मागील वेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे राजकुमार पटेल हे आमदार होते.

तर आता त्यांनी शिंदे सेनेच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याने महायुतीमधून भाजपच्या गोटातून बंडखोरी होण्याची चिन्हे दिसत आहे. पटेल यांच्या विरोधात प्रभुदास भिलावेकर, केवलराम काळे असे अनेक दिग्गज निवडणूक रिंगणात दिसणार आहे. बळवंत वानखडे यांची लोकसभेत वर्णी लागल्याने रिता असलेल्या दर्यापूर मतदारसंघात महायूतीतून शिवसेनेकडून माजी आमदार अभिजित अडसूळ, भाजपकडून रमेश बुंदिले, काँग्रेसकडून गुणवंत देवपारे यांच्यासह इच्छूकांची मोठी रांग आहे. बडनेरा मतदारसंघात विद्यमान आमदार रवी राणा यांना टक्कर देण्याकरिता मागील वेळी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून निवडणूक रिंगणात असलेल्या प्रिती बंड किंवा सुनील खराटे तर महायूतीकडून तुषार भारतीय रिंगणात राहणार आहे.

तिवसा मतदार संघात विद्यमान आमदार यशोमती ठाकुर यांना लढत देण्याकरिता गेल्या निवडणूकीत दुसऱ्या क्रमांकाची मत घेतलेले तत्कालीन शिवसेनेचे राजेश वानखडे आता भाजपकडून दंड थोपटणार आहे. तिसऱ्या आघाडी मधील छोटु वसु एक प्रकारचे आव्हानच ठरणार आहे.

# हे वय लोकसभा, विधानसभा लढण्याचे नाही!

## हर्षवर्धन देशमुखांनी स्पष्टच सांगितले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )** – मोर्शी-वरुड विधानसभा मतदारसंघातून शरद पवारांच्या राष्ट्रीवादी काँग्रेस पक्षाकडून माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांना उमेदवारी घोषीत होणार असल्याच्या चर्चांना गुरुवारी(दि.17) खुद्द हर्षवर्धन देशमुखांनी स्पष्टीकरण देत ब्रेक लावला. त्यांनी सांगितले की, लोकसभा निवडणूकीच्या वेळी सुरुवातीला जरी मी निवडणूक लढण्याची तयारी केली होती, मात्र निवडणूकीचा अवाका पाहता मी शरद पवारांना स्पष्टच नाही म्हटले, आणि आताही विधानसभेकरिता माझी कुठलीच उमेदवारी राहणार नाही, कारण हे वय लोकसभा, विधानसभा निवडणूका लढण्याचे नाही, मी इतकी धावपळ करु शकत नसल्याचे हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले.



महायुतीच्या राष्ट्रवादीकडून म्हणजेच अजित पवार गटाकडून विद्यमान आमदार देवेंद्र भूयार यांना उमेदवारी मिळणार असल्याचे चित्र दिसत आहे. असे असताना महाविकास आघाडीकडून शरद पवार गटाला मोर्शी मतदार संघाची जागा सुटणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामूळे माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख हे तुतारीवर लढणार असल्याच्या वावड्या उठायला लागल्या होत्या. मात्र गुरुवारी हर्षवर्धन देशमुख यांनी या चर्चांना फुलस्टॉप दिला. त्यांनी सांगितले की, मला एका दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी मिळते. परंतू माझे वय पाहता मी आता लोकसभा किंवा विधानसभेसारखी निवडणूक लढू शकत नाही. मी कुठलीच उमेदवारी शरद पवारांना मागितली नाही, आणि मागणारही नाही.

### तर विक्रम ठाकरेंच्या सोबत राहू!

देशमुख म्हणाले की, गेल्या निवडणूकीमध्ये आम्ही देवेंद्र भूयारांना पाठींबा दिला आणि ते आमदार झाले. परंतू जे त्यांना आमच्याकडे मिळाले नसावे ते त्यांना अजित पवार गटात मिळाले असावे, म्हणून ते तिकडे गेले. आता विक्रम ठाकरेही तुतारी लढत असतील तर आम्ही त्यांच्याही सोबत राहू. असेही त्यांनी स्पष्ट केले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेलाही लागला ब्रेक !

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 17 )**– जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत आतापर्यंत 7 लाख 16 हजार 905 लाडक्या बहिणींनी अर्ज दाखल केले आहेत. यामधून 6 लाख 99 हजार 716 अर्ज मंजूर केलेले आहेत. तर 75 हजार 211 लाडक्या बहिणींचे आधार सिडिंग न झाल्याने त्यांचे अद्यापही पैसे जमा झाले नाहीत.



याशिवाय 10 हजार 330 अर्ज पडताळणीमध्ये आहेत. अशातच आता मंगळवारी दुपारी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने या संपूर्ण प्रक्रियेला ब्रेक लागला आहे. त्यामुळे प्रतीक्षेतील महिला लाभार्थीच्या खात्यात 23 नोव्हेंबरनंतरच अनुदान जमा होणार आहे. सोबतच आता नव्याने अर्ज भरण्याची प्रक्रिया बंद करण्यात आली आहे. याबाबत राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाच्या सचिवांनी बुधवारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेतलेल्या व्हिसीवरील सभेत सूचना दिलेल्या आहेत.

जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये नारीशक्ती ॲपवर 3 लाख 98 हजार 341 महिलांनी अर्ज केले होते. त्यानंतर अंगणवाडी सेविकांच्या पोर्टलवरून 3 लाख 1 हजार 42 महिलांनी पुन्हा या योजनेकरिता नोंदणी केली आहे. त्यामुळे आतापर्यंत 7 लाख 16 हजार 905 महिलांनी लाडकी बहीण योजनेकरिता अर्ज केले आहेत. यापैकी आतापर्यंत 6 लाख 99 हजार 716 महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यापैकी 4 हजार 363 महिलांचे अर्ज फेटाळण्यात आले आहेत. तर 10,330 हजारांवर अर्ज पडताळणीमध्ये आहेत. अशातच जिल्ह्यात अद्यापही 75 हजार 211 महिलांचे आधारकार्ड बँकेला संलग्न नसल्याने त्यांचे अनुदान रखडले आहे. त्यामुळे त्यांचे सिडिंग झाल्यानंतर बँक प्रक्रियेतील अनुदान त्या लाभार्थीना प्राप्त होईल; परंतु नव्याने अर्ज करणे व पुढील टप्पा याशिवाय त्रुटीत असलेल्या अर्जाची पडताळणी प्रक्रियेला मात्र आचारसंहितेमुळे आता ब्रेक लागला आहे, त्यामुळे सध्या तरी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला ब्रेक लागला आहे.

# राखेची वाहतूक करणाऱ्या दोन ट्रकचालकांना मारहाण

## ■ वाहनांसह चालकांना जाळून टाकण्याची दिली धमकी
## ■ सावर्डी येथील घटना, चार आरोपी विरोधात गुन्हे दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव पेठ,( दि.17 )** – ओव्हरलोड वाहतूक आणि वाहनांतून उडणाऱ्या राखेचा मुद्दा माध्यमांनी उचलल्यानंतर प्रादेशिक परिवहन विभागाने वाहनांवर कार्यवाहीचा धडाका सुरू केला.यामध्ये तीन दिवसात पंधरा वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली मात्र नियमानुसार वाहतूक करणाऱ्या काही वाहनांना अडवून चालकांना मारहाण करण्याच्या काही घटना उघडकीस आल्या. यामध्ये नांदगाव पेठ व माहुली जहागीर पोलिसात अज्ञात आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, 15 ऑक्टोबर रोजी रात्री 10 वाजताच्या दरम्यान रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पामधून वाहन क्र.यूपी 64,बीटी 8563 व यूपी 64,बीटी 8793चे चालक राखेची वाहतूक करतांना सावर्डी येथील टी पॉईंट जवळ एका बोलेरो वाहनाने हे दोन्ही ट्रक थांबविले. बोलेरो वाहनांतून अज्ञात चार आरोपींनी दोन्ही ट्रकचालकांना ओव्हरलोड गाडी कशी काय चालवत आहे म्हणून वाहनाची आरसी मागितली.चालकाने आरसी मालकाकडे असल्याचे सांगताच भडकलेल्या आरोपींनी दोन्ही वाहनांच्या चालकांना बेदम मारहाण करत अश्लील शिवीगाळ केली तसेच यापुढे या मार्गावर वाहन दिसल्यास वाहनांसह दोन्ही चालकांना जाळून टाकण्याची धमकी दिली. भयभीत झालेले दोन्ही चालक तेथून निघून गेले. त्यानंतर त्यांनी नांदगाव पेटज पोलिस स्टेशनला रीतसर तक्रार दाखल करत पोलिसांना आपबिती सांगितली. पोलिसांनी फिर्यादी चालक कृष्णकुमार नन्हकुमार कनोजिया,वय 29,हातीम अन्सारी रा.माहुली जहागीर यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध बीएनएस 126(2),296,115(2), 351(2)कलमान्वये गुन्हा दाखल त्या अज्ञात चार आरोपींचा शोध घेत आहे.गुन्हा दाखल झाल्यानंतर चोवीस तासात आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आले नव्हते मात्र लवकरच आरोपी तुरुंगात असतील अशी ग्वाही पोलिसांनी दिली.

# निवडणूक काळात घेण्यात येणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्याची विद्यार्थ्यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 17 )** संत गाडगे बाबा अमरावती वि?द्यापीठ अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी 2024 परीक्षा ह्या 11 नोव्हेंबर 2024 ते 21 नोव्हेंबर 2024 ह्या दरम्यान होणार आहेत आणि याच दरम्यान महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 पार पडणार आहेत, त्यामुळे त्या 10 दिवसात निवडणुकांचा प्रचारांचा धुमाकूळ असणार आहे, प्रचार रॅली, प्रचार सभा भोंग्यांचा आवाज या सर्व घटना होणार आहेत आणि विद्यार्थी सुद्धा सर्व समजाचा, सिस्टिमचा, महाराष्ट्र राज्याचा भाग असल्याने निवडणुकीच्या महोत्सवात सहभागी होतील त्यामुळे साहजिकच या सर्व गोष्टींचा परिणाम हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार आहे, या सर्व गोंधळात विद्यार्थी अभ्यास, उजळणी करू शकणार नाही परिणामी त्याचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन आपण विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी 2024 परीक्षा ह्या 11 नोव्हेंबर 2024 ते 21 नोव्हेंबर 2024 ऐवजी डिसेंबर 2024 च्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात याव्या अशी मागणी केली. एलएलबी 3 इयर डिग्री



कोर्स च्या दुसऱ्या सत्राचा निकाल 22/08/2024 उशिरा लागल्याने, विद्यार्थ्यांचे प्रवेश उशिरा झाले आणि त्यात अभ्यासक्रमात बदल झाल्याचे परिपत्रक जाहीर केले तोपर्यंत विद्यार्थ्यांनी कोणता अभ्यास करायचा जुना की नवीन हे अधिकृत रित्या विद्यापीठाने जाहीर केलेले नव्हते, त्यामुळे त्या परिपत्रकापसून फक्त 44 दिवसाचा कालावधी मिळतो त्यात 11 दिवस शासकीय सुट्या आहेत त्यामुळे फक्त 33 दिवसाचा अतिशय कमी वेळ विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी मिळत आहे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन आपण विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी 2024 परीक्षा ह्या 11 नोव्हेंबर 2024 ते 21 नोव्हेंबर 2024 ऐवजी डिसेंबर 2024 च्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात याव्या अशी नितिन साहेबराव जामनिक विद्यार्थी प्रतीनिधीने निवेदनाद्वारे मागणी केली.

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत व्याख्यान

## कृषीरत्न डॉ.पंजाबराव देशमुख यांचा शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती उत्सव

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी ( दि.17 )**– श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित शिवाजी उच्च माध्यमिक शाळा येथे शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे रौप्य महोत्सवी जयंतीवर्षानिमित्य फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे खरे वैचारिक वारसदार श्रद्धेय डॉ.भाऊसाहेब या विषयावर यवतमाळ येथील प्राध्यापक प्रवीण देशमुख यांचे व्याख्यान दि. 20 ऑक्टोबर रोजी रविवारला स्वर्गीय अण्णासाहेब कानफाडे स्मृती रंगमंदिर शिवाजी उच्च माध्यमिक शाळा,मोर्शी येथे आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाला मोर्शीतील जास्तीत संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, स्वर्गीय अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गणगणे, आर.आर.लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य चौधरी व शिवाजी कॉन्व्हेंट च्या मुख्याध्यापिका निकम या सर्वांनी सर्व मोर्शीकर नागरिकांना केले आहे.

# नियोजित वराची बिन भाड्याच्या खोलीत रवानगी

## बोहल्यावर चढण्यापूर्वीच पोलिसांनी काढली वरात

**विलास पाटील**
**वरुड,( दि.17 )**– एका फायनांन्स कंपनीमध्ये कार्यरत एका अधिकाऱ्याला पोलिसांनी अटक केली. विशेष म्हणजे हा अधिकारी नियोजित वर होता, 15 ऑक्टोबर लग्न असताना बोहल्यावर चढण्यापुर्वीच पोलिसांनी या अधिकाऱ्याची वरात काढून त्याला बिनभाड्याच्या खोलीत रवानगी केली.



प्रतीक (रा. काटोल) नामक हा अधिकारी एका फायनन्स कंपनीमध्ये वसुली अधिकारी म्हणून कार्यरत आहे. वसुली केलेल्या 4 लाख 30 हजार 940 रुपयांचा शाखेत भरणा न केल्याच्या आरोपाखाली प्रतीकला पोलिसांनी 26 सप्टेंबर रोजी अटक केली. 15 ऑक्टोबरला लग्न आणि त्या आधी हळदीचा कार्यक्रम असल्याने ऐन हळद लागण्याअगोदरच पोलिसांनी त्याला विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून प्रतिकची कारागृहात रवानगी केली. या प्रकारामूळे वधू पक्षाकडील मंडळीच्या पायाखालची जमीनच सरकली. आपल्या वैवाहिक जीवनाचे स्वप्न रंगविणाऱ्या वधूकरिता तर आभाळच फाटले. नियोजित लग्नाच्या तयारीवर पाणी फेरल्या जाते की काय? अशी परिस्थिती असताना ॲड.मंगेश काठीवाले यांनी न्यायालयात यशस्वी युक्तिवाद करून प्रतिकची 15 ऑक्टोंबरला ठरलेल्या लग्नाच्या अगोदर म्हणजे 14 ऑक्टोंबरलाच जामीन मिळविला व कारागृहातून सुटका केली. त्यामुळे लग्न ठरलेल्या दिवशी होऊ शकले. दोन्ही कुटूंबियांनी ॲड. काठीवाले व न्यायव्यस्थेला धन्यवाद दिले.

# गोंड गोवारी जमातीचा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा

## ■ चांदूर रेल्वेच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन ■

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि. 17 )**– आदिवासी गोंड गोवारी जमात संघर्ष कृती समिती महाराष्ट्र च्या माध्यमातून विविध मागण्यांकरिता जानेवारी 2024 पासून आंदोलने, आमरण उपोषण सुरू असुन याला शासनाकडून ठोस प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण गोंड गोवारी जमातीच्या वतीने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवर बहिष्काराचा पवित्रा घेतला असुन याबाबतचे निवेदन चांदूर रेल्वेच्या एसडीओंना देण्यात आले.



शासनाने 24 एप्रिल 1985 च्या शासन निर्णयातील गोंड गोवारी बाबत असलेली चुकीची माहिती वगळून तात्काळ सर्वोच्च न्यायालयाने 18 डिसेंबर 2020 रोजी दिलेल्या निर्णयातील पॅरा क्रं 25 ते 33 च्या संविधानिक व वैधानिक तरतुदींच्या अधीन राहून पॅरा क्रमांक 83 नुसार 1985 च्या शासन निर्णयात दुरुस्ती करण्यात यावी व अनुसूचित जमातीच्या सोई सवलती तात्काळ देण्यात यावे, 12 मे 2006 रोजी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर यांनी शासनास सादर केलेल्या संशोधन अहवालानुसार मूळ महसुली पुरावे गोवारी , गोवारा, गवारी असले तरी गोंड गोवारी जमातीचे जात व वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे तसेच महाराष्ट्र शासनाने गोंड गोवारी जमातीला लावलेले चुकीचे व असंविधानिक क्षेत्रबंधन तात्काळ हटवावे आदी मागण्यांकरिता 26 जानेवारी 2024 पासून संघर्ष कृती समितीच्या माध्यमातून आमरण उपोषण करण्यात आले होते. याची दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समितीच्या शिष्टमंडळाची 10 फेब्रुवारी 2024 रोजी बैठक घेऊन गोंड गोवारी जमातीच्या समस्यांचे तथा संविधानिक मागणी संदर्भात अभ्यास करण्यासाठी के.एल. वडणे समिती स्थापन करून 6 महिन्याच्या आत सकारात्मक अहवाल शासनाला सादर करण्याबाबत निर्णय घेतला होता. परंतू आज 9 महिने होऊन सुद्धा वडणे समितीचा सकारात्मक अहवाल शासनाकडे सादर झाला नसल्याने आदिवासी गोंड गोवारी जमातीमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. गेल्या 70 वर्षांपासून गोंड गोवारी जमातीचे मतदार अख्या महाराष्ट्र राज्यात मतदान करून उमेदवार निवडून आणण्यात आपले संविधानिक कर्तव्य पार पडतात. मात्र सत्तेवर असलेले शासन ह्या गोंड गोवारी जमतीच्या कोणत्याही मागण्या 40 वर्षांपासून पूर्ण करून न्याय देत नाही. त्यामुळे चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेच्या शाखा च्या वतीने मतदानावर बहिष्कारचे निवेदन उपविभागीय कार्यालय, चांदूर रेल्वेच्या यांना देण्यात आले. सदर मागण्या शासनाने आचारसंहितेच्या आधी पूर्ण केल्या नाही तर अमरावती जिल्ह्यातील गोंड गोवारी जमातीतर्फे निवडणुकीवर बहिष्कार टाकण्यात येईल असे निवेदन देण्यात आले. निवेदन देतांना कार्यकारी संयोजक किशोर भोयर, प्रवीण चौधरी, योगेश नेवारे, सागर शेंद्रे, अरुण शेंद्रे, बंटी नागोशे, प्रभाकर सोनोने, प्रमोद सोनोने, अविनाश अंबाडारे, दिलीप नेवारे, नितीन नेवारे, राजू नेवारे, मोहन वाघ्याडे, महेंद्र सहारे, प्रशांत चौधरी, गजानन भोंडे, पवन चौधरी, अमोल कोहळे यांसह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

# तिवसा मतदारसंघात ‘अदृश्य’ विकास कामांचे ‘दृश्य’ फलक !

## ही पांढरपेशे पुढारी, सावकार, ठेकेदारांची बनवाबनवी



## यशोमती ठाकुर यांचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.17 )**– तिवसा तालुक्यातील जनतेला मुर्ख बनविण्याकरिता भाजपच्या पांढरपेश्या पुढाऱ्यांनी विकास कामांचे फलक अनेक गावांमध्ये लावले, मात्र ज्या विकास कामांचे हे फलक लावण्यात आले आहे, ते विकास कामे आचारसंहिता लागल्यावरही अदृश्य आहे. ही विकासकामे झालीच नाही. भाजपचे पांढरपेशे पुढारी, सावकारी आणि ठेकेदारांची ही बनवाबनवी असल्याचा आरोप माजीमंत्री तथा तिवसा मतदारसंघाच्या आमदार ॲड.यशोमती ठाकूर यांनी केला आहे.

काही दिवसांपुर्वी ॲड. यशोमती ठाकूर यांनी तिवसा तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन केले. दरम्यान भाजपचे विद्यमान खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खा. नवनित राणा, भाजपचे पदाधिकारी राजेश वानखडे यांनी लावलेल्या अनेक विकास कामांचे फलक दिसले. आ. ठाकूर यांचा आरोप आहे की, वास्तवात ही विकासकामे झालीच नाही. या विकास कामांच्या नावाने लाखो रुपये या लोकांनी गिळंकृत केले. मात्र जोपर्यंत कामे निविदाप्रक्रीयेला लागत नाही, तोपर्यंत आम्ही भूमिपूजनच करित नाही, असेही आ.ठाकूर यावेळी म्हणाल्या.

फलक लावून कामे कागदावर दाखविणारे व्हाईट कॉलर सावकारी, सरकारी निधीवर डल्ला मारणारे, जनतेची दिशाभूल करणारे ठेकेदार असल्याचे आ. ठाकूर म्हणाल्या. तिवसा तालुक्यातील वरुडा, अनकवाडी व अन्य गावांत विविध विकास कामांचे भूमिपूजन करताना गावकऱ्यांनी अश्या लोकांचा खोटारडेपणा व देखावा उघड केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

# चुकांची पुनरावृत्ती होवू देवू नका!

## निवडणुकीतील प्रत्येक टप्प्याची काळजीपूर्वक कार्यवाही करावी- जिल्हाधिकारी सौरभ कटियार





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.17 )** – विधानसभा सार्वत्रिक निवडणूक एकाच टप्प्यात होणार असल्याने सर्व मतदारसंघांत एकाचवेळी कार्यवाही करावी लागणार आहे. प्रामुख्याने उमेदवारी अर्ज, मतदान आणि मतमोजणी या निवडणुकीच्या टप्प्यावर सर्व यंत्रणांनी काळजीपूर्वक कार्यवाही करावी, चुकांची पुनरावृत्ती होवू देवू नका असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आगामी विधानसभा निवडणुकीबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार म्हणाले, गेल्या निवडणुकीमधील त्रुटी यावेळी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. या त्रुटी दूर करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अधिक लक्ष द्यावे. प्रामुख्याने एकूण मतदानाच्या आकडेवारीमध्ये विसंगती दिसून येते. त्यामुळे मतदान पथकाला सदर मतदानाची एकूण संख्या कळविताना अचूक कळविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच डाटा तयार करताना अचूक आकडेवारी देण्यासाठी जबाबदार पथक नेमण्यात यावे. ही आकडेवारी परत तपासून पहावी.

### टपाली मतपत्रिकेवर विशेष लक्ष

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, यावेळी निवडणूक आदेशासोबत टपाली मतपत्रिका राहणार आहे. त्यामुळे आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कर्तव्यावरील अधिकारी, कर्मचारी यांना टपाली मतपत्रिका उपलब्ध करून देण्यात याव्यात. दिव्यांग आणि 85 वर्षे वयाच्या नागरिकांना घरून मतदानाचा पर्याय दिला आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना टपाली मतपत्रिका उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. नागरिकांकडून मतदारयादीत नाव नसल्याच्या तक्रारी येतात. त्यामुळे सध्यास्थितीत नाव नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात यावी. तसेच नाव नोंदणीसाठी आलेले अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावे. अर्जाबाबत शंका असल्यास बीएलओमार्फत स्थळ पाहणी करून याबाबत निर्णय घेण्यात यावा. मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी मतदान चिठ्ठी पोहोचविणे महत्वाचे आहे. त्यामुळे सर्व मतदारांपर्यंत मतदार चिठ्ठी देण्यात यावी. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध सामाजिक संस्थांचा सहभाग घेण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

# अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या कर्जाची सोडतीद्वारे निवड

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती** – साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या सुविधा कर्ज योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड सोडतीद्वारे करण्यात आली. योजनेतील 5 पाच लाख रुपये आणि महिला समृद्धी योजनेंतर्गत प्रकल्प मर्यादा 1 लाख 40 हजार रुपये आहे. लाभार्थी निवड समितीने सुविधा कर्ज योजनेचे 145 कर्ज मागणी अर्ज पात्र केले असून महिला समृद्धी योजनेंतर्गत 63 कर्ज मागणी अर्ज पात्र ठरले आहेत.

लाभार्थ्यांची चिठ्ठीद्वारे निवड निवासी उपजिल्हाधिकारी तथा लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर घ्यारे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. बैठकीमध्ये सुविधा कर्ज योजनमध्ये 50 कर्ज प्रस्तावाचे उद्दिष्ट असून यात 145 पात्र अर्जामध्ये 92 पुरुष आणि 53 महिला आहे. त्यापैकी 30 पुरुष व 20 महिला असे एकुण 50 लाभार्थ्यांची सोडतीद्वारे निवड करण्यात आली. महिला समृद्धी कर्ज योजनेमध्ये 40 कर्ज प्रस्तावाचे उद्दिष्ट असून 63 पात्र अर्जापैकी 40 महिला लाभार्थ्यांची सोडतीद्वारे निवड करण्यात आली. यावेळी निवड समितीचे सदस्य तथा समाजकल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर, जिल्हा व्यवस्थापक तथा सदस्य सचिव जगदीश गाभणे उपस्थित होते.